दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे
बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार दि.१९ नोव्हेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -९५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

तिन्ही पक्ष मिळून उच्च पदाचा निर्णय घेऊ-देवेंद्र फडणवीस

मुंबई (वृत्तसंस्था)-आम्ह्या महायुतीमध्ये कुठलेही मतभेद नाहीत, असे म्हणत भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेवर भाष्य केले आहे. नागपूर येथे पत्रकारांशी देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला. पक्ष श्रेष्ठींशी चर्चा करून पुढील वाटचाल ठरवली जाणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले आहे.देवांद्र फडणवीस म्हणाले, शिंदे साहेब असतील, पवार साहेब असतील निश्चितपणे आम्ही सगळे एकत्रित आहोत. आम्ह्या महायुतीमध्ये कुठलेही मतभेद नाहीत. आम्ही निवडणुकीच्या पूर्वी देखील सांगितले होते की सगळे निर्णय सोबत बसून होतील. आमचे श्रेष्ठी असतील ते आम्हाच्यासोबत बसून सगळे निर्णय घेतील. त्यामुळे मला असे वाटते की कोणाच्या मनात किंतु परंतु असेल तर आज माननीय एकनाथ शिंदे साहेबांनी तो देखील दूर केला आहे.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्रिपदाबाबत्च्या चर्चेला लवकरच आपल्याला उत्तर मिळेल. तिन्ही पक्ष मिळून मुख्यमंत्रिपदाबाबत्चा निर्णय लवकरच घेतील. आम्ही सगळे पक्ष श्रेष्ठींशी चर्चा करत आहोत. लवकरच आपल्याला याचे उत्तर मिळेल.

पराभव मोठ्या मनाने मान्य करावा लागतो
धनंजय मुंडे यांचा नाना पटोलेंना टोला
ईव्हीएमवर बोलणे हा भाबडेपणा

शिर्डी (वृत्तसंस्था)-काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी निवडणूक आयोगावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जनतेची मते चोरण्याचे काम निवडणूक आयोग करत असल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला होता. यावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पराभव मोठ्या मनाने मान्य करावा लागतो. आम्ही लोकसभा निवडणुकीवेळी मान्य केला होता, असे मुंडे म्हणाले. जनतेने आम्हाला दिलेला यश हे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मोठ्या मनाने कबूल करावे, असा टोलाही मुंडे यांनी नाना पटोले यांना लगावला.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. त्यांना ५० चा आकडाही गाठता आला नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडले. नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाला सवाल मतदानाच्या टक्केवारीत झालेल्या तफावतबाबत उत्तर मागितले. यावर धनंजय मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली. ते शिर्डी येथे माध्यमांशी बोलत होते.धनंजय मुंडे म्हणाले, तुम्ही लोकसभेत जिंकता तेव्हा तुम्हाला जनतेने जिंकवले. आता तुम्ही विधानसभेत हरता तेव्हा तुमची ही हार ईव्हीएममुळे झाली, अशा पद्धतीचा सूरू असलेला भाबडेपणा महाराष्ट्रातील जनतेला कळून चुकला आहे. ईव्हीएमबाबत मतदान कसे झाले? उशिरा का झाले? याबाबत बोलण्यात काहीही अर्थ नाही. पराभव मोठ्या मनाने मान्य करावा लागतो. आम्ही देखील लोकसभा निवडणुकीतील पराभव मान्य केला होता. तेव्हा आम्ही ईव्हीएम वगैरे बोललो नाही, असे ते म्हणाले.धनंजय मुंडे यांनी विजय वडेट्टीवार यांच्याबरही टीका केली. काँग्रिसचे नेते जे म्हणतायत किंवा आरोप करताय त्यांची काय अवस्था झाली हे त्यांनी एकदा बघावे. ते कोठे होते आणि आता कुठे आले आहेत. त्यांनी जी काही आहे, वेवढी पण ठेवली नाही. वेवढी लाज राहिली आहे तेवढी तरी त्यांनी राखावी. २०२९ चे सांगण्यापेक्षा आज महाराष्ट्रातील मायबाप जनतेने तुम्हाला जो धडा शिकवला त्याबद्दल बोला ना? अशी टीका त्यांनी वडेट्टीवार यांच्यावर केली.

आमचे यश मोठ्या मनाने कबूल करावे
जनतेने आम्हाला दिलेला यश हे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मोठ्या मनाने कबूल करावे, असा टोला धनंजय मुंडे यांनी नाना पटोले यांना लगावला.
मंत्रीपदाबाबत महायुतीचे वरिष्ठ नेते जो निर्णय एकत्रित बसून घेतील, तो आम्हा सर्वांना मान्य असणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

बीड शहरात वाढत चाललेले ध्वनी प्रदुषण, कोणाचा जीव घेऊनच शांत बसणार का?
बीड ट्रॅफिक पोलीस यांचा आवाज आता तरी बंद करा!

बीड । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून गाड्यांच्या मोठ्या कर्कश आवाजाने डोके वर काढलेलं दिसत आहे. एके काळी ध्वनी प्रदुषण हा सर्वात शेवटी विचार केला जाणारा प्रकार होता. पण ही बाब आता गांभीर्याने घेणे, आणि काळजी करायला लावणारे प्रदुषण झाले आहे. या मध्ये डिजे, गाड्यांचे हॉर्न, बुलेट चे गाडी चालवत असताना फटाके फोडणे, असे प्रकार बीड शहरात सर्रास पणे चालू असताना दिसतात. पण बीड शहरातील नवयुवक यांच्यासाठी ही बाब मजेशीर जरी असली तरी ती प्रत्यक्षात , ज्येष्ठांना, भयंकर प्रमाणात त्रासदायक ठरत आहे.

बीड शहरातील ट्रॅफिक पोलिस हे फक्त विरीमिरी घेण्यासाठी दुसऱ्या पासिंग च्या गाड्यांना अडवणे, त्यांना त्रास देऊन त्यांच्या कडून पैशांची अपेक्षा ठेवणे, ईव्ह पर्वत्य यांचे कर्तव्य पार पाडत आहे. पण सर्वात जास्त महत्वाचं नवं युवकांमुळे वाढलेले ध्वनी प्रदुषणाला आळा बसवणे हे त्यांना महत्वाच वाटत नाही.

ज्येष्ठ नागरिकांबरही त्याचा परिणाम होतो. यांचं सर्वात आधी दिसणारं लक्षण म्हणजे हृदात धडधड वाढणे आणि रक्तदाबावर परिणाम होणे. तज्ज्ञांच्या मते, हृदयावर ताण आल्यामुळे मायोकार्डियल इन्फ्रॅक्शन म्हणजेच हृदयविकाराच्या झटक्याच्यापर्यंत हा त्रास जाऊ शकतो किंवा स्ट्रोकबाही त्रास होऊ शकतो. पण हे थांबणार कधी? ध्वनी प्रदूषण ही जगभरात वाढत चाललेली समस्या आहे. जशी जशी लोकसंख्या वाढत आहे, तसतशी शहरी भागामध्ये या ध्वनी प्रदूषणाची पातळी ही वाढत आहे.

पण हे थांबणार कधी? बीड शहरातील ट्रॅफिक पोलिसांना याचा जाब कोण विचारणार? की शहरातील वाढत चाललेल्या कर्णकर्कश आवाजामुळे कोणाचा मृत्यू झाल्यावरच हे थांबणार का?

व्यसनाधीन युवा पिढीत वाढतोय कर्करोगाचा धोका

विहामांडवा । प्रतिनिधी

तंबाखूजन्य पदार्थांच्या पाकीटवर तंबाखूपासून कर्करोग होतो, असे ठळक अक्षरात लिहलेले असतानाही युवा पिढी मोठ्या प्रमाणात तंबाखुयुक्त गुटखा व पाऊच सेवन करीत आहे. युवकांच्या आरोग्यावर या सवयींचा अंत्यत वाईट परिणाम पडत असुन कर्करोगाच्या रुग्णांमध्ये युवकांची संख्या वाढत चालली आहे. एफीकडे शासन तंबाखुयुक्त पदार्थ विक्रीवर बंदी घालत आहे. तर दुसरीकडे बाजारात निर्भिडपणे तंबाखुयुक्त पदार्थ विक्री केली जात आहे. यामुळे युवकांच्या आरोग्यावर होत असलेल्या परिणामास शासनच जबाबदार असल्याची प्रतिक्रिया सुज्ञ नागरिक व्यक्त करू लागले आहे.ग्रामिण भागात युवकामध्ये तसेच महिलावर्गामध्ये तंबाखू, गुटखा सिगारेट आदी वस्तू सेवन करण्याचे प्रमाण वाढते आहे. परिसरातील अनेक युवक तसेच शाळेची मुले व्यसनाच्या आधिन होत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. जनजागृती कारण्याच्या उद्देशाने प्रशासन आता तंबाखु उत्पादनावर कॅन्यपग्रस्त जबडा चित्रप्रकाशित करीत आहे. तसेच विचवाचे चित्र गुटख्याच्या पुड्यावर असतानाही खाणाऱ्यांची संख्या कमी होताना दिसत नाही. प्रत्येकच दिकाणी गावात तंबाखुमिश्रीत उत्पादनाची मोठ्या प्रमाणात विक्री केली जात आहे. शासनाच्या नियमप्रमाणे या वस्तूंची विक्री होत असली तरी नागरिकांच्या आरोग्यासाठी या उत्पादनावर वैद्यकीय इशाराचा मजकूर तसेच चित्र प्रकाशित करण्याची सक्ती शासनाच्या वतीने करण्यात आली असतानाही व्यवसनाधीन युवकांवर त्याचा परिणाम होताना दिसत नाही. तरी शासनाने एकतर उत्पादनावर बंदी घालावी किंवा जास्त कर लाटून व्यसनांच्या वस्तूचे भाव वाढवावे. त्यामुळे व्यसन करणाऱ्यांचे प्रमाण कमी होऊन एक सुदृढ आरोग्यवर्धक पिढी देशासाठी निर्माण होईल, अशी आशा सुज्ञ नागरिक व्यक्त करताना दिसत आहे.

बियाणे, खतांत बनवेगिरी; १० विक्रेत्यांवर गुन्हे दाखल
कृषी गुणनियंत्रण विभागाची कारवाई

छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे

बनावट आणि विनापरवाना बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशकांची विक्री करणाऱ्या १० विक्रेत्यांवर कृषी विभागाच्या गुणनियंत्रण विभागाने गुन्हे नोंदविले आहेत. मागील पाच महिन्यांत छत्रपती संभाजीनगर, बीड आणि जालना जिल्ह्यांत ही कारवाई झाल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने दिली.

वैजापूर शहरात कृषी विभागाने मे महिन्यात छापा टाकून नाथ बायोजेक कंपनीच्या अनधिकृत विक्रेत्याला सरकी बियाण्यांची विक्री करताना पकडले होते. या प्रकरणी वैजापूर ठाण्यात ज्ञानेश्वर बकाळे यांच्याविरोधात गुन्हा नोंद झाला आहे. जुनमध्ये पैठण तालुक्यात गुजरातच्या व्यापाऱ्याने, कुरिअरने पाठविलेले बियाणे कृषी विभागाने जप्त केले होते. या प्रकरणी परेशकुमार अबिनभाई पटेल यांच्या विरोधात पैठण ठाण्यात गुन्हा नोंद झाला. गंगापूर तालुक्यात बनावट कापूस बियाणे विक्री केल्याप्रकरणी आकाश अण्णासाहेब गुडसे, भूषण रामेश्वर पाटील, विशाल बाबासाहेब पाटे, पवन सोपान बोरकर यांच्याविरोधात गुन्हा नोंदविला होता. अंबड येथे जादा दराने सरकी बियाणे विक्री करताना अनिल राजा गायकवाड, पांडुरंग धर्मराज शेळके, डोमेश्वर कृषी सेवा केंद्र, अंबड यांच्याविरोधात गुन्हे नोंद झाले. बीडमधील तलवाडा येथे रमेश प्रभाकर डरके या विक्रेत्याकर जादा दराने बियाणे विक्रीचा गुन्हा नोंदविण्यात आल्याचे विभागीय गुणनियंत्रण अधिकारी काळुसे यांनी सांगितले

खतविक्रेत्यांवर कारवाई

❖ महाराष्ट्रात खतविक्रीचा परवाना नसताना जालना जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना धरपोच रासायनिक खतांची विक्री करणाऱ्या कंपनीच्या विक्रेत्यावर कृषी विभागाने पोलिसांत कारवाई केली. एम. एस. ग्रीन फेनिलाइझर्स प्रा. लि, कंपनीचे विक्रेते श्रावण लिंबाजी सांगळे यांच्याविरोधात ३० मे रोजी गुन्हा नोंदविला होता.

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील एका शेतात रासायनिक खताच्या तब्बल २ हजार गोण्या फेकून देत निसर्गाला नुकसान पोहोचविल्याप्रकरणी गुजरातच्या सदार केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर कंपनी आणि त्यांचा विक्रेता गणेश गवतेवर गुन्हा नोंदविण्यात आला होता.

❖ वैजापूर येथील आकाश सोमनाथ जगताप आणि अन्य आरोपी नामांकित कंपन्यांच्या बीगपध्ये बनावट खते भरून बियापत्याना गोदामात साठवत होते.. या प्रकरणी शिवूर पोलिस ठाण्यात २३ नोव्हेंबर रोजी गुन्हा नोंदविला. बंदी असलेले कीटकनाशक

❖ जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील गणराज ॲग्रो ट्रेडर्सचे मालक श्रीराम काचारी जन्हाड यांनी त्यांच्या दुकानात केंद्र सरकारने बंदी घातलेले कीटकनाशक विक्रीसाठी ठेवल्याचे आढळून आले.

❖ या प्रकरणी कृषी अधिकाऱ्यांनी जहाइरिरोधात पोलिसांत गुन्हा नोंदविला.

आमदार संदीप क्षीरसागर यांच्या विजयाने हिवरापाहाडीत जल्लोश

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदार संघात आमदार संदीप क्षीरसागर यांचा विजय झाल्याने बीड तालुक्यातील हिवरापाहाडी डोगरपटयात गुलालाची उधळण करीत फटाके वाजवून पेढे वाटून आनंद साजरा करत वाजत गाजत जल्लोश साजरा करण्यात आला या बद्दल अधिक माहिती अशी की नुकतच विधानसभा निवडणूकीचा निकाल लागला असुन बीड विधानसभा मतदारसंघात शरद पवार राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे उमेदवार आमदार संदीप क्षीरसागर विरूद्ध अजित पवार राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे उमेदवार डॉ योगेश क्षिरसागर यांच्या मध्ये अटीतटीच्या दुरंगी लढतीत विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांचा विजय झाला यांच्या विजयाचा जल्लोष बीड तालुक्यातील हिवरापाहाडी येथे वाजत गाजत फटाके वाजवून गुलाल उधळीत पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला या मध्ये किसन दुरगुडे रमेश हुलगुडे सुनिल दिंदे यांचे जावेदी शेख बाळु शिंदे रामा चोरमले साईनाथ शिंदे अंगद शिंदे ईत्यादि नी सहभागी झाले होते.

सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करणाऱ्या माथेफिरू विरुद्ध गुन्हा दाखल

केज । गौतम बचुटे

सोशल मीडियावर दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी पोस्ट व्हायरल केल्या प्रकरणी केज पोलिसांनी एका माथेफिरू विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.या बाबतची माहिती अशी की, दि. १७ नोव्हेंबर रोजी केज पोलीसांना एका गुप्त खबऱ्या मार्फत माहिती मिळाली की, एका माथेफिरूने त्याच्या फेसबुक अकाऊंटच्या आयडीवर मुस्लिम समाजाच्या भावना भडकाविणारी पोस्ट व्हायरल केली आहे. त्याची माहिती पोलीस जमादार श्रीकांत चौधरी यांनी प्रभारी अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना दिली. त्यांच्या आदेशा वरून पोलिसांनी तपास करून माहिती घेतली असता सदर तरुण हा केज शहरातील अहिल्यादेवी नगर येथील सचिन सदाशिव मनेरी असल्याचे निष्पन्न झाले. त्या नंतर पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या आदेशाने सचिन मनेरी याला पोलिसांनी ताब्यात घेवून त्याच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६२९/२०२४ भा.न्या.सं. १९६, ३५३(२) या सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन हे करीत आहेत.

संपादकीय

अलिप्ततेची सत्त्वपरीक्षा

इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष भारताच्या हिताचा नाही. इराणने क्षेपणास्त्रांचा तुंबळ मारा केल्यानंतर राजकीय नवसंजीवनी मिळालेले इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांनी 'इराणला याची किंमत चुकवावी लागेल,' असे म्हटले आहे. इस्रायलने लगेच टोल्याला प्रतिटोला असे न करता काहीशी वाट पाहण्याचे ठरविलेले दिसते. इस्रायल इराणी तेलविहिरी तसेच तेल शुद्धीकरण प्रकल्प उद्ध्वस्त करण्याचा विचार करीत आहे; असे म्हणतात. असे झाले तर जगाचा तोटा होईल तो होईलच; पण भारताच्या अर्थकारणाला आणि एकूण विकासाच्या वाटचालीला तो जबर फटका असेल.

अनेकदा इराणकडून आयात होणाऱ्या तेलाचे प्रमाण गरजेच्या दहा टक्क्यांच्या वर असते. रशिया-युक्रेन यांच्या संघर्षात जसे भारताने दबावाला बळी न पडता रशियाकडून तेल घेणे थांबविले नाही, तसेच 'इराणकडून तेल घेऊ नका,' हे जागतिक दादांचे फर्मानही आपण कधी ऐकले नाही. अर्थात, इराणी तेलविहिरी उद्ध्वस्त करण्यापूर्वी इस्रायलला दहादा विचार करावा लागेल. ताजा आखाती संघर्ष सुरू झाल्यापासून तेलाच्या किमती एकदा तीन व एकदा दोन अशा पाच टक्क्यांनी वधारल्या आहेत. जगभर शेअर बाजारांना हुडहुडी भरते आहे. थोडी जरी अस्थिरता आली तरी लगेच सोने वधारते. तसे होते आहे. या साऱ्या घटनाक्रमात आधी युद्धग्रस्त इराणचे आणि नंतर इतर आखाती देशांमधील खनिज तेल भारताला मिळाले नाही तर मोठाच अनवस्था प्रसंग उभा राहील. तशी दुश्चिन्हे दिसत आहेत.इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली असतानाच इराणी बंदरांजवळ इराण आणि भारत यांच्या नौदलांचा संयुक्त युद्धसराव सुरू झाला आहे. असे युद्धसराव अचानक होत नाहीत आणि त्यांची तयारी अनेक महिने सुरू असली तरी आखातात संघर्ष पेटल्यानंतर भारताने हा युद्धसराव रद्द केला नाही; हे लक्षात घ्यावे लागेल. मोठ्या युद्धाचे काळे-कभिन्न ढग आखाती आकाशात भरून आलेले असताना भारताच्या युद्धनौका आखातात असणे; याला अतिशय महत्त्व आहे. हा औपचारिक युद्धसराव संपल्यानंतर इराणच्या विनंतीने किंवा स्वत:हून भारतीय युद्धनौका इराणी सागरातला मुक्काम वाढवितात का, हे पाहावे लागेल. इराण व इस्रायल यांच्या संवादासाठी भारत प्रयत्न करेल का, या प्रश्नावर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी परवा होकारार्थी उत्तर दिले. मात्र, भारताला रशिया व युक्रेन यांच्या संघर्षात अशी कोणतीही भूमिका अद्याप बजावता आलेली नाही. तेव्हा इराण व इस्रायल आपले ऐकतील, असा समज करून घेण्यात काही अर्थ नाही. अर्थात, हा संघर्ष टळला तर जागतिक शांतीइतकाच भारतीय अर्थकारण वाचविण्याचा प्रमुख उद्देशही साध्य होणार आहे. युक्रेन-रशिया युद्धाचा मोठा फटका भारताला आज बसतो आहे. आखाती संघर्ष अधिक पेटला तर तो कित्येक पटींनी वाढेल.अण्वस्त्रसज्जता कबूल न करणाऱ्या इराणने चार वर्षांपूर्वीही इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली होती. इस्रायलने इराणी अधिकाऱ्यांना टिपणे, स्फोट घडवून आणणे अशी माफक उत्तरे तेव्हा दिली तरी सुदैवाने थेट युद्धास तोंड फुटले नव्हते. तसेच यावेळीही होऊ शकते. दुसऱ्या महायुद्धानंतर 'मर्यादित युद्ध' (लिमिटेड वॉर) अशी संकल्पना विकसित झाली. (पुढे अमेरिकेने ती 'मर्यादित अणुयुद्ध' अशी ताणली.) असे मर्यादित युद्ध झाले तर प्रत्युत्तर देण्याची खुमखुमी भागते; तशीच आपल्या ताकदीची नेमकी कल्पनाही शत्रूला करून देता येते. तेव्हा सर्वंकष युद्धाच्या वाटेला न जाता गेली अनेक दशके चालू असणारी खडाखडी इराण व इस्रायल कायम ठेवतात, की यावेळी मात्र टोकाला जातात, यावर सारे अवलंबून आहे. अमेरिकी अध्यक्ष जाहीरपणे काहीही बोलत असले तरी असे युद्ध न होण्यासाठी अमेरिकेने इस्रायलवर दबाव टाकणे, आवश्यक आहे. आज आखातात इस्रायल अनेक आघाड्यांवर लढत आहे. मात्र, देशात मनुष्यबळाचा तुटवडा पडतो आहे.भारतासहित इतर देशांमधून विविध प्रकारचे कर्मचारी मागवावे लागत आहेत. त्यातच इराणकडे अणुबॉम्ब आहे आणि तिथल्या शिया राज्यकर्त्या धर्मगुरूंच्या शहाणपणाला मध्ययुगीन संकल्पनांचे कुंपण आहे; हे विसरून चालणार नाही. थोडक्यात, या संघर्षात आपली नेमकी किती शक्ती पणाला लावायची, याचा समंजस विचार इस्रायलला करावा लागेल. इराण काही वर्षांत अनेक अंगांनी कमकुवत झाला आहे आणि तो भासवतो तितका बलिष्ठ नाही; असे अनेक अभ्यासक मानतात. हे खरे असेल तर इराणची शिल्लक ताकद इतर अनेक मार्गांनीही संपवता येईल. त्यासाठी युद्ध कशाला? इराण हा जुना मित्र आणि दुसरीकडे इस्रायली मैत्रीची ओढ; या दुविधेत भारताच्या अलिप्ततेची नवी सत्त्वपरीक्षा सुरू झाली आहे. दोन्ही मित्रांचे हात पकडून त्यांना थांबविण्याइतकी ही अलिप्तता अजून शक्तिशाली झालेली नाही; ही बोच या निमित्ताने अधिक ठळक होते.

सुखद स्वयंप्रज्ञेचे सुचिन्ह!

बुद्धिबळपटू हरिका द्रोणावल्लीपुढे आता दोन वैयक्तिक, कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत. बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेमुळे पुढे ढकलल्या गेलेल्या आई आणि आजीच्या गुडघेरोपण शस्त्रक्रियांच्या तारखा ठरवून त्या लवकरात लवकर करून घेणे आणि लेक हन्विकाच्या दुसऱ्या वाढदिवसाची तयारी. हरिका 'परफेक्शनिस्ट' असल्याने यात कोणतीही हलगर्जी होणार नाही, याची सर्वतोपरी दक्षता तिला घ्यायची आहे; अगदी तशीच, जशी तिने बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या निर्णायक सामन्यातील डावात अझरबैजानच्या गुनाय मम्मदझादाशी पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना घेतली होती. अखेरच्या या अकराव्या फेरीत हरिका पहिल्या पटावर खेळत होती आणि तिचा या डावातील विजय महिला संघासाठी फार महत्त्वाचा होता. नागपूरची दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल यांनीही विजय मिळवले, तर आर. वैशालीला बरोबरीवर समाधान मानावे लागले. पण तोवर भारतीय महिला संघाचे सुवर्णपदक निश्चित झाले होते. जागतिक बुद्धिबळाच्या पटावरील अत्यंत प्रतिष्ठेच्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णयश संपादन करून भारताने बुद्धिबळविश्वातील महासत्ता होण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. यात पुरुष संघाचा खुल्या स्पर्धेतील विजय वर्चस्व सिद्ध करणारा होता, तर खडतर परिस्थितीतून वाट काढत महिला संघाने मिळवलेल्या सुवर्णपदकामुळे या यशाची झळाळी आणखी वाढली.

बुद्धिबळाच्या पटावरील भारताचे हे वर्चस्व खचितच सुखद आहे. एरवी आपण क्रिकेटप्रेमात इतके आकंठ बुडलेले आहोतच. पण नव्या शतकाच्या सुरुवातीपासून ही परिस्थिती धिम्या गतीने बदलू लागली आणि इतरही खेळांना प्रोत्साहन मिळू लागले. त्यात जसा विविध क्रीडाप्रकारांत झालेला नव्या प्रतिभावान खेळाडूंचा उगम हे एक कारण, तर त्यांचा खेळ दाखविणाऱ्या आणि त्याद्वारे तो पाहणारे प्रेक्षक निर्माण करणाऱ्या संपर्क साधनांचा विस्तार हे दुसरे. क्रिकेटपायी या खेळांचा अगदीच अनुल्लेख व्हायचा, तो टळून त्याकडे लक्ष जाण्याइतपत आपलीही प्रेक्षक म्हणून कामगिरी सुधारली आहे. बुद्धिबळासारख्या- पाहण्यासाठीही मोठ्या संयमाची मागणी करणाऱ्या - खेळातील यश साजरे होणे, हे त्या अर्थाने दिलासादायक.

बुद्धिबळ म्हणजे तत्कालीन सोव्हिएत महासंघ, त्यातून फुटलेले देश, रशिया, अमेरिका, हंगेरी आणि अलीकडच्या काळात चीन या प्रबळ देशांची मक्तेदारी. यंदा ती मोडण्याचा पराक्रम करताना भारताने, विशेषत: पुरुष संघाने खुल्या गटात जे वर्चस्व गाजवले, ते पाहून भारतीयांची मान अभिमानाने ताठ होईल. ऑलिम्पियाडमध्ये खेळाव्या लागणाऱ्या ११ फेऱ्यांत जास्तीत जास्त २२ गुण मिळू शकतात, अशा वेळी भारताच्या पुरुष संघाने २१ गुण मिळवून जेतेपद खेचले. आपल्या मागचा दुसरा संघ १७ गुणांवर आहे, हे पाहिल्यावर या यशाची महत्ता अधिक ठसठशीतपणे दिसेल. दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे अमेरिका आणि उझबेकिस्तान आहेत, तर चीन चौथ्या क्रमांकावर आहे. पुरुष संघाने ११ पैकी १० फेऱ्या जिंकल्या आणि १ बरोबरीत सोडवली, म्हणजे एकही पराजय न स्वीकारता हे जेतेपद मिळवले, हे आणखी विशेष. महिला संघाचे ११ फेऱ्यांत १९ गुण आहेत, ते पोलंड आणि अमेरिकेविरुद्ध हार पत्करल्यानंतरही जिद्दीने खेळून अखेरच्या फेरीत केलेल्या कामगिरीमुळे आहेत, हे लक्षात घेतले, तर महिला संघाने विजय अक्षरश: खेचून आणला आहे, हे अधोरेखित होईल. एकाच ऑलिम्पियाडमध्ये दोन्ही सांघिक स्पर्धा जिंकण्याचा प्रसंग २०१८ नंतर पहिल्यांदा घडला आणि असे दुहेरी यश आतापर्यंत फक्त तत्कालीन सोव्हिएत महासंघ, रशिया, अर्मेनिया, हंगेरी आणि अमेरिका यांनीच मिळवले आहे. म्हणजे असे वर्चस्व गाजवणारा भारत हा केवळ सहावा संघ आहे.गेली बरीच वर्षे भारताचा जागतिक बुद्धिबळविश्वातील दबदबा एखाद्या नावापुरता मर्यादित होता. अभिजित कुंटे, रघुनंदन गोखले, प्रवीण ठिपसे, मृणालिनी कुंटे, भाग्यश्री ठिपसे या मराठी नावांची मोहोर बुद्धिबळ पटावर होती. पण, जगज्जेतेपद मिळवल्याने विश्वनाथन आनंद हे त्यातील सर्वांत ठळक. मराठी जनांसाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे जयश्री खाडिलकर यांनी १९७९ मध्ये महिला इंटरनॅशनल मास्टरचा मिळवलेला किताब. भारताने आतापर्यंत ८४ ग्रँडमास्टर निर्माण केले. विश्वनाथन आनंद हा पहिला. म्हणजे सगळे ग्रँडमास्टर घडले आहेत, ते गेल्या साडेतीन दशकांत. आनंदचे महत्त्व अधिक, कारण बुद्धिबळातही कारकीर्द होऊ शकते, यावर अनेकांचा विश्वास त्याला पाहून बसला. ज्या पुरुष भारतीय संघाने यंदाच्या ऑलिम्पियाडमध्ये जेतेपद मिळवले, त्यातील अर्जुन एरिगसी, डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद हे जेमतेम विशीत आहेत, तर २०१८ मध्ये 'लोकसत्ता तरुण तेजांकित'ने सन्मानित झालेला नाशिकचा विदित गुजराथी आता तिशीत. आनंद हा या सगळ्यांची कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर प्रेरणा. आनंद ग्रँडमास्टर झाला, तेव्हा यापैकी कुणाचा जन्मही झाला नव्हता. आज आनंद त्यांचे तोंड भरून कौतुक करण्यासाठी पुढे आला आहे. 'ऑलिम्पियाडमध्ये कोणत्याही संघाने यापूर्वी असे वर्चस्व गाजवल्याचे माझ्या तरी स्मरणात नाही,' हे आनंदचे उद्गार बुद्धिबळातील आपले भविष्य किती उज्ज्वल आहे, याची साक्ष देणारे आहेत.सारे जग आश्चर्यमिश्रित कौतुकभरल्या नजरांनी भारतीय संघाकडे पाहते आहे आणि त्यात महिला संघाचीही प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. कोनेरू हम्पी पहिली भारतीय महिला ग्रँडमास्टर झाली, ती एकविसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीला. त्याला दोन दशके होत असताना आपण जागतिक दर्जाच्या स्पर्धेत जेतेपद मिळवणे खूपच प्रशंसनीय. हम्पी या वेळच्या ऑलिम्पियाडमध्येही खेळली असती, पण वैयक्तिक कारणांसाठी तिने माघार घेतली. त्या वेळी महिला संघात अनुभवी बुद्धिबळपटू हवी, म्हणून प्रशिक्षक अभिजित कुंटे यांनी हरिकाला विनंती केली आणि तिनेही ती मान्य करून संघाच्या यशात आपला अनुभव पणाला लावला. हरिका आपल्या दोन वर्षांच्या मुलीशी स्पर्धेदरम्यान दूरध्वनीवरून बोललीही नाही, ते खेळताना भावनाशीलता बाजूला राहावी म्हणून. तिच्या या समर्पित वृत्तीला जेतेपदापेक्षा मोठे पारिश्रमिक काय असू शकते? महिला संघातील वैशालीसाठीही हे यश असेच मोठे, कारण पुरुष संघातील प्रसिद्ध बुद्धिबळपटू प्रज्ञानंदची बहीण यापेक्षा तिला तिची स्वतंत्र ओळख हवी होती, ती यामुळे मिळाली आहे. यंदाच 'लोकसत्ता तरुण तेजांकित' ठरलेल्या नागपूरच्या दिव्या देशमुखने तर सुवर्णपदक जिंकून सांघिक यशाला वैयक्तिक कामगिरीचीही सोनेरी किनार जोडली आहे.बुद्धिबळ हा अस्सल भारतीय खेळ, पण रशिया आणि तत्कालीन सोव्हिएत महासंघ, तसेच पूर्व युरोपातील देशांनी वर्षानुवर्षे त्यावर अधिराज्य गाजवले. अमेरिकाही फार मागे राहिली नाही आणि चीननेही गेल्या काही काळात मुसंडी मारली. एकच घर पुढे सरकणाऱ्या प्याद्यापासून तिरकी चाल करणारा उंट, अडीच घरे उड्या मारणारा घोडा आणि कसाही सरकू शकणाऱ्या वजिरापर्यंतचे मोहरे खेळवणारे बुद्धिबळ शीतयुद्धाच्या काळात हेरगिरीपर्यंत जाऊन पोहोचले होते. अलीकडच्या काळात 'नेटफ्लिक्स'वरच्या 'क्वीन्स गॅम्बिट' या मालिकेमुळे या खेळाला वलय आले आणि नंतर त्याची महिलांचा बुद्धिबळातील सहभाग ते त्यांच्या पेहरावावरून व्यक्त केली जाणारी मते, अशा विविधांगाने चर्चा होऊ लागली. पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे होते ते भारताने या खेळात सांघिक जेतेपद मिळवणे. ते आता साध्य झाले आहे. अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने संघांना सव्वातीन कोटींचे पारितोषिक जाहीर केले, तेही औचित्याचे. कृत्रिम प्रज्ञेच्या आजच्या प्रभावकाळातही मानवी बुद्धीच्या लखलखण्याला इतके मोठे जागतिक परिमाण आहे आणि त्यात भारत अग्रेसर आहे, हे सुचिन्ह.

चीनचा खासगी तलाव?

सर्व जगाचे लक्ष पश्चिम आशियातील रणधुमाळीकडे असताना आपल्या पूर्वेला तेवढ्याच महत्वाचा संघर्ष सुरू आहे. दक्षिण चीन उपसागरातील अक्षरशः ठिपक्यांसारखी लहान बेटे आणि काही ठिकाणी फक्त खडक यांच्यावर कुणाचे नियंत्रण आहे किंवा असावे याबद्दल आक्रमक शह-काटशह अशा जीवघेण्या हालचाली चालू आहेत आणि याच्या मध्यभागी बलाढ्य चीन आपल्या लहान शेजारी देशांशी लढायला तयार आहे. भारताचा क्वाड संघटनेत सक्रिय सहभाग आणि हल्लीच अमेरिकेत अध्यक्षांच्या पुढाकाराने झालेल्या चर्चा, यांच्यामुळे शासनाला त्याची किती जाणीव आहे हे दिसून येते. प्रथम समस्या समजून घ्यावी. वादाचा उगम दुसरे महायुद्ध संपल्यानंतरचा आहे. युद्धकाळात जपानने दक्षिण चीन सागराच्या भोवतालच्या चीनसह सर्व देशांना आपल्या वसाहती बनवल्या होत्या.

जपानचा युद्धात पराभव झाल्यानंतर एक एक करून सर्व देश स्वतंत्र झाले. यात प्रामुख्याने कम्युनिस्ट चीन, व्हिएतनाम, फिलीपिन्स आणि मलेशिया होते. तैवान स्वतंत्र असला तरी चीनने ते कधीच मान्य केले नाही. उल्लेख केलेले सर्व देश दक्षिण चीन उपसागरावर आंतरराष्ट्रीय नियमांप्रमाणे आर्थिक वापर आणि दळणवळणासाठी आपला अधिकार आहे, असे समजतात. सर्व मान्य असले तरी चीनने उपसागराच्या बहुतांश क्षेत्रावर आपला अधिकार घोषित केला आहे व याची सीमा नकाशावर त्यांनी नऊ रेषा आखून दर्शवली आहे; जी संबंधित शेजारी देशांना मान्य नाही. शी जिनपिंग हे सन २०१४मध्ये सत्तेत आल्यानंतर त्यांनी वादाला अधिक धार आणली. महायुद्धात जपानने वसाहती देशांवर केलेल्या अत्याचारांमुळे त्यांनी क्षेत्रात काहीही पुढाकार घेण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे व चीन याचा पूर्ण फायदा घेऊन त्यांच्याकडे दुर्लक्ष करायची संधी सोडत नाही, याची नोंद घ्यायला हवी.

या उपसागरात दोन प्रमुख बेट समूह दिसतात. व्हिएतनामच्या ईशान्येला १३० बेटांचा पॅरासेल समूह आहे. सन १९७४मध्ये चीनने हा समूह बळकावून तिथे हवाईपट्टी बांधली आणि सैनिक तैनात केले. आज हा सर्वांत शांत आणि विनावाद प्रदेश आहे. महत्त्वाचा स्प्रॅटली बेट समूह याचा विस्तार फिलीपिन्सच्या पश्चिमेपासून दक्षिणेला बोर्निओ (मलेशिया) पर्यंत आहे व हा खरा वादाचा टापू आहे. फिलीपिन्सची राजधानी मनिला याच्या जवळची बेटे आहेत त्यांना 'स्कारबोरो शोल' म्हणतात. येथून चीनला मनिलावर नियंत्रण ठेवता येऊ नये म्हणून फिलीपिनी नौदलाने सन १९९९मध्ये 'सियेरा माद्रे' नावाची नौका जबरदस्तीने तेथील किनाऱ्यावर चढवून आपले नियंत्रण जाहीर केले. मागील वर्षी नौकेच्या निमित्ताने बांधकाम करण्यासाठी युद्धनौकांच्या ताफ्यात सामग्री पाठवली आणि चीनने त्यांना अडवले.

पुढे 'सियेरा माद्रे'वरील नाविकांचा रसदपुरवठा कमी पडू लागल्याने फिलीपिनी नौदलाने जूनमध्ये जबरदस्तीने आपल्या नौका धाडल्या. त्यावेळी चीनशी झालेल्या चकमकीत शस्त्रे वापरली गेली नाहीत; परंतु झटापटीत एका फिलीपिनी सैनिकाचा आंगठा कापला गेला. अखेर दोन्ही देशांनी सामंजस्य दाखवून वाटाघाटीत ठरवले, की रसद पुरवठा होऊ शकतो परंतु बांधकाम नाही. सध्या 'सियेरा माद्रे' आपल्या जागेवर आहे, परंतु स्थिती तणावपूर्ण आणि पुढील वाटाघाटींच्या प्रतिक्षेत आहे. फिलीपिन्सच्या दक्षिणेला 'सबिना शोल' बेट समूह आहे जिथे त्यांनी तटरक्षक नौका 'टेरेसा मॅगबुवानाला' एप्रिल महिन्यात गस्त घालण्यास तैनात केली आणि चीनने तिला बळजबरीने हटवण्यासाठी ३१ ऑगस्टला धडक देउन नौकेत भगदाड पाडले व तणाव वाढला. आता याचे पर्यवसान सशस्त्र चकमकीत होऊ नये म्हणून दोन्ही देश प्रयत्नशील आहेत.उपसागराच्या दक्षिणेला मलेशियाचा बोर्निओ प्रांत येतो. मलेशियाला तेथे खनिज तेल व नैसर्गिक वायू यांचा शोध करायचा आहे आणि चीनचा त्याला विरोध आहे. व्हिएतनामच्या पूर्व तटाचा प्रदेश भारतासाठी महत्त्वाचा आहे. आंतरराष्ट्रीय नियमांनुसार व्हिएतनामला तेथे मासेमारी आणि खनिज तेल शोधण्याचा हक्क आहे. चीनचा त्यासही विरोध आहे. करोना काळापूर्वी व्हिएतनामने भारताकडे खनिज तेलाचा शोधासाठी आपल्या नौकांची मदत मागितली होती व त्याप्रमाणे पुढे कारवाई सुरू होती. चीन आणि व्हिएतनाम यांच्यातील वादांमध्ये भारताला विनाकारण अडकायला नको; परंतु काही प्रसंग असे असतात ज्याच्यात भारताला माघार घेणे शक्य नाही.

पश्चिम आशियातील युद्धात जशी अमेरिकेची भूमिका निर्णायक आहे तशीच या प्रदेशातही आहे; कारण अमेरिकेने फिलीपिन्स आणि तैवान यांना गरज पडल्यास सशस्त्र मदतीची हमी दिली आहे. काही वर्षांपूर्वी चीन अधिक आक्रमक झाल्याने अमेरिकेच्या बलाढ्य विमानवाहू युद्धनौका आणि त्यांचे ताफे दक्षिण चीन उपसागरात नियमित गस्त घालत होते. अमेरिकेच्या प्रतिनिधी मंडळाच्या अध्यक्ष नॅन्सी पलोली यांनी चीनच्या कट्टर विरोधात तैवानला प्रसिद्धीच्या झोतात भेट दिली होती. त्यावेळी चीन शाब्दिक विरोधापलीकडे काहीही करू शकला नव्हता. मध्यंतरी परिस्थिती निवळल्याने अमेरिकेने गस्त घालणे कमी केले. परंतु फिलीपिनी घडामोडींमुळे त्यांचे लक्ष पुन्हा इथे वळले आहे. मूळ प्रश्न सोपा आहे - फिलीपिन्सच्या मदतीसाठी अमेरिका कितपत तयार आहे आणि याचा फायदा घेऊन फिलीपाइन्स किती संयम मर्यादा पाळू शकते. क्वाडचा सदस्य असल्याने भारतासाठी हे प्रश्न आता केवळ तात्विक उरले नसून, त्याला त्या प्रश्नांना थेट सामोरे जावे लागणारे आहेत.

भारतासमोर असे प्रसंग आता वारंवार येणार आहेत. रशिया-युक्रेन युद्धात दोन्ही पक्ष भारताच्या मध्यस्थीसाठी राजी आहेत असे समजते; परंतु यात किती तथ्य आहे, हे अद्याप उघड झालेले नाही. तसेच इस्त्रायल आणि हमास किंवा हिजबुल्ला यांच्या युद्धात भारत शांततेच्या पक्षात असला तरी काय करू शकतो किंवा करेल याबद्दल स्पष्टता नाही, परंतु क्वाड संघटनेचा सदस्य असल्याने पूर्वेकडे भारताकडून ठोस कारवाईची अपेक्षा आहे. पूर्व लडाखच्या सीमेवर आज आपले सैन्य चीनच्या विरोधात तणावपूर्ण वातावरणात सज्ज आहे. ताज्या बातम्यांनुसार काही प्रश्न सुटण्याची शक्यता दिसू लागली आहे, असे समजते. खरा मुद्दा आहे तो या पार्श्वभूमीवर भारत-चीन संबंधांची दिशा काय असावी, हा. क्वाडकडून भारताच्या सहकार्याच्या अपेक्षा आहेत. त्या प्रत्यक्ष दक्षिण चीन उपसागरात उपस्थितीच्या नसून मलाक्का सामुद्रधुनीपासून पश्चिमेला हिंद महासागरात गस्त घालून संरक्षणाच्या आहेत. भारतीय युद्धनौका जशा आफ्रिकेच्या पूर्व तटावर चाच्यांविरुद्ध कारवाई करतात त्याचप्रमाणे पूर्वेकडे सुरक्षा देण्यासाठी करतील, असे अपेक्षित आहे.भारत धोरणात्मक स्वातंत्र्य किती ठेवू शकेल, हा कळीचा मुद्दा आहे. आपले हित फक्त आपणच सांभाळू शकतो. उदा. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नुकतेच अमेरिकेचा यशस्वी दौरा करून आले. परंतु त्यांना भेटण्याआधी तेथील शासनाने काही खलिस्तानी शिख प्रतिधीनींना भेटून संरक्षणाची ग्वाही दिली. तसेच एका अमेरिकी न्यायालयाने आपल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांना न्यायालयात हजर राहण्यासाठी फर्मान काढले होते. याला आपण काय म्हणावे? हीच स्थिती चीनच्या बाबतीत आहे. शी जिनपिंग यांचा भव्य पाहुणचार अहमदाबाद आणि नंतर माम्मलापूरम येथे पारंपारिक पद्धतीने केला; याच्यामुळे संबंध काही सुधारले नाहीत. थोडक्यात परराष्ट्र संबंधांत मैत्री, पाहुणचार इ. वातावरण निर्मितीसाठी असतात. कागदावर जिथे सही होते तेच वास्तव असते, हे आपण आत्मसात केले पाहिजे.

यशवंतराव चव्हाण यांनी सर्वच क्षेत्रात केलेले काम आज ही दिशादर्शक–कुलपती डॉ.पी.डी.पाटील

यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचा शानदार समारोप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक, राजकीय, साहित्य, औद्योगिक, सांस्कृतिक आणि इतर सर्वच क्षेत्रात केलेले काम आज दिशादर्शक आहे असे मत डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ.पी.डी.पाटील यांनी व्यक्त केले. येथील बेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या समारोपीय भाषणात डॉ.पी.डी.पाटील बोलत होते.

यावेळी पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक सचिन इटकर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई चे दत्ता बाळ सराफ हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार अतिर्गीकांत विजय बोराडे (कृषी), या. बाबा भांड (साहित्य), पत्रकार पं. सतीष व्यास (संगीत) आणि देविदास सौदागर (युवा गौरव) हे चार पुरस्कार मूर्ती यांच्या सह यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचे सचीव दगडू लोमटे हे उपस्थित होते. आपल्या विस्तारीत भाषणात पुढे बोलतांना डॉ. पी.डी.पाटील पुढे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांचे निधन १९८४ साली झाले आणि त्यानंतर यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचा हा कार्यक्रम १९८५ साली

भगवानराव लोमटे यांनी हा समारोह सुरु केला. गेली ४० वर्षे हा समारोह आज ही अव्याहतपणे सुरु आहे यांचे कारावे तेवढे कौतुक कमी आहे. यशवंतराव चव्हाण यांचे कार्य सर्व क्षेत्रात होते. राज्यातील सामाजिक, राजकीय, साहित्य, कृषी, सांस्कृतिक, औद्योगिक किंवा इतर असे एक ही क्षेत्र नाही ज्या क्षेत्रामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे कार्य केले नाही. यशवंतराव चव्हाण यांनी केलेले हे कार्य आज ही दिशादर्शक ठरणारे काम आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जपण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास माजा अध्यक्ष म्हणून उपस्थित राहता आले हे माझं भाग्य आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी पुरस्कार प्राप्त विजय बोराडे, बाबा भांड, पं. सतीष व्यास आणि देविदास सौदागर यांचे कार्य आता मराठवाड्यापुरतेच मर्यादित राहिले नाही तर ते आता महाराष्ट्रालाही दिशादर्शक ठरणार आहे असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात युवा साहित्यिक म्हणून ज्यांचा गौरव करण्यात आला त्या देविदास सौदागर यांनी उच्च शिक्षण घेऊन ही ते आपल्या कुटुंबियांच्या उपजिवेकेसाठी शिलाई मशीन वर कपडे शिवण्याचे काम करीत आहेत. त्यांना या परिस्थितिन बाहेर येण्यासाठी व त्यांची साहित्य सेवा विकसीत करण्यासाठी ५ लाख रुपये भेट देणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले.अंबाजोगाई शहरात गेल्या ३९ वर्षापासून यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जपण्यासाठी, त्यांच्या विचारांची जपवणुक या तीन दिवसीय स्मृती समारोहाची सुरु करण्याचे काम ही एक चळवळ आसून या कामाचे कौतुक डॉ.पी.डी.पाटील कल्प स्मृती समितीला शुभेच्छा देवून संयोजकांचे कौतुक केले.या कार्यक्रमास विशेष अतिथी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई चे दत्ता बाळ सराफ यांनी आपले विचार मांडले. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रस्ताविक स्मृती समारोह समितीचे सचीव दगडू लोमटे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक त्यांनी या समारोहाची सुरवात ३९ वर्षापुर्वी या समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व.डी. भगवानराव्जी लोमटे उर्फ बापु, भगवानराव शिंदे व त्यांच्या सहका–यांनी महाराष्ट्राचे शिल्पकार तथा पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीना उजाळा देण्यासाठी केली. सुसंस्कृत महाराष्ट्राच्या निर्मिती साठी यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत असणाऱ्या साहित्य, कला–संगीत, कृषी आणि युवा शक्ती यांची सांगड घालत यासर्व बाबींची माहिती या तीन दिवसीय यशवंराव चव्हाण स्मृती समारोहात दिली. या कार्यक्रमास जिल्हा, अंबाजोगाई तालुक्यातील जेष्ठ नागरिक, साहित्यिक, कलाप्रेमी नागरिक, महिला ,युवक बहुसंख्येने उपस्थित होते.

राहुल गांधींच्या नेतृत्वात जन आंदोलन छेडणार–नाना पटोले

नागपूर (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले असून महायुतीने पुन्हा एकदा महाराष्ट्रात सत्ता स्थापन करण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत. मात्र, महायुतीला मिळालेल्या या यशावर महाविकास आघाडीने ईव्हीएम मशीनवर शंका उपस्थित केली आहे. तसेच निवडणुका बॅलट पेपरवर घेण्याची देखील मागणी केली जात आहे. यावर कॉग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नाना पटोले माध्यमांशी बोलताना म्हणाले, जनतेचा आवाज बन्न आम्ही आता जनआंदोलन सुरू करणार आहोत. जनतेला वाटत आहे की निवडणूक बॅलट पेपरवर घेण्यात यावी. बॅलट पेपररीलच निवडणुकांसाठी सहांची मोहीम आम्ही राबवणार आहोत. मतदान करण्याचा अधिकार आहे. मात्र मशीन आमचे मत



चोरत असल्याची भावना जनतेत असल्याचे नाना पटोले यांनी सांगितले आहे.

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, राहुल गांधी यांच्या नेतृत्वात जनआंदोलन आम्ही सुरू करणार आहोत. तसेच आम्ही निर्णय घेतला आहे की राहुल गांधी यांचे जन आंदोलन हे महाराष्ट्रात सर्वात मोठ्या प्रमाणात असणार आहे, अशी माहिती नाना पटोले यांनी दिली आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात आता महायुतीचे सरकार स्थापन होणार असून त्यासाठी महायुतीच्या नेत्यांच्या हालचालीत सुरू आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मुख्यमंत्रीपद सोडणार असल्याचे संकेत पत्रकार परिषदेत दिले आहेत. या आधी अजित पवारांनी देखील भाजपलाच पाठिंबा जाहीर केला होता. शिवसेनेकडून मुख्यमंत्रिपदावर दावा केला होता तसेच शिंदेनाच मुख्यमंत्री करा, असा आग्रह देखील शिवसेनेने केला होता.पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशीसह एकनाथ शिंदे यांनी चर्चा केली व त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत भूमिका बदलली असून भाजपला पाठिंबा जाहीर केला आहे. यामुळे आता देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रिपदाशीठा मार्ग मोकळा झाला असल्याचे दिसत आहे.

एकनाथ शिंदेंची महायुती म्हणून भूमिका मोठी–चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीच्या मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतून माघार घेण्याची घोषणा केली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या या भूमिकेचे स्वागत केले आहे. विरोधी पक्षांनी एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या वावड्या उठवल्या. पण शिंदे यांनी स्वत:च पुढे येऊन आपली व आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी महायुती म्हणून घेतलेली भूमिका खुप मोठी आहे, असे ते म्हणाले. एकनाथ शिंदे यांनी बुधवारी सायंकाळी ४ च्या सुमारास एक पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी आपण मुख्यमंत्रीपदाच्या मुद्यावर नाराज नसल्याचे ठणकावून सांगितले. विशेषत: मुख्यमंत्री पदावर पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जो निर्णय घेतली तो आपल्याला मान्य असल्याचेही त्यांनी यावेळी प्रामुख्याने अधोरेखित केले. त्यांच्या या भूमिकेमुळे भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मानले जात आहे. या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेचे स्वागत केले. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महायुतीचे आमचे नेते एकनाथ शिंदे यांचे मी आभार मानतो. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी कालपासून एकनाथ शिंदे महायुतीत नाराज असल्याच्या वावड्या उठवत होते. शिंदेसाख्या अत्यंत कर्तबगार व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित करत होते. पण आज शिंदेंनी स्वत:हून महायुतीचे नेते म्हणून अत्यंत स्पष्टपणे महाराष्ट्रासह देशाच्या जनतेपुढे आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी मुख्यमंत्रीपदाविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजपचे केंद्रीय नेतृत्व जो काही निर्णय घेतील त्याला पाठिंबा दर्शवला.चंद्रशेखर बावनकुळे पुढे म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी महायुतीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाची भूमिका घेतली. याद्वारे त्यांनी विरोधी पक्षांच्या त्या काही तोंडाच्या वाफा सुरू होत्या त्यासाठी पूर्णविराम दिला. शिंदेंनी महाराष्ट्राच्या विकासासाठी खूप काम केले. आम्ही पूर्वीपासूनच त्यांचे काम पाहतो. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार असताना शिंदे यांनी मंत्री म्हणून उत्कृष्ट काम केले. त्यांनी फडणवीस यांच्या खांद्याला खांदा लावून समृद्धी महामार्गाचे काम पूर्ण केले.उद्धव ठाकरे यांनी भाजपला धोका दिला. हे एकनाथ शिंदे यांना पटले नाही. त्यामुळे त्यांनी हिंदुत्वाची भूमिका घेऊन, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांला पुढे नेऊन, पुन्हा या महाराष्ट्रात शिवशाहीचे सरकार आणण्यासाठी मोठी भूमिका घेतली. त्यांनी महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून त्यांनी विकसात मोठे योगदान दिले. त्यांनी फडणवीस व अजित पवारांच्या मदतीने महाराष्ट्राला पुढे नेले. ते एक कणखर मुख्यमंत्री ठरले.

एकनाथ शिंदेंच्या बंडामुळेच भाजप सत्तेत:लाडक्या भावाकडे दुर्लक्ष करता येणार नाही–बच्चू कडू

मुंबई (वृत्तसंस्था)

भाजप सत्तेत आला ते एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे. भाजप सत्तेत आलीच नसती तर आज जे चित्र दिसत आहे, तसे चित्र दिसले नसते. शिंदेंनी बंड केले नसते तर लाडकी बहिणी योजना देखील आली नसती. त्यामुळे ज्या लाडक्या भावाने लाडकी बहीण योजना शोधून काढली. त्या लाडक्या भावाकडे तुम्हाला दुर्लक्ष करता येणार नसल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी म्हटले आहे. या माध्यमातून मुख्यमंत्री पदाबाबत एकनाथ शिंदे यांचा दावा प्रबळ करण्याचा प्रयत्न कडू यांनी केला.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर तसेच एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिंदे यांना साथ देणाऱ्यांच्या गुवाहाटीला पोहोचलेले आमदार बच्चू कडू यांचा आता विधानसभा निवडणुकीत पराभव झाला आहे. मात्र तरी देखील त्यांनी एकनाथ शिंदे यांची साथ सोडलेली नाही. भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या यशामध्ये एकनाथ शिंदे यांचा मोठा वाटा असल्याचे बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

जातीचा नव्हे तर धर्माचा फॅक्टर या निवडणुकीत महत्त्वाचा ठरला असल्याचा दावा बच्चू कडू यांनी केला आहे. धर्माचा इंडा जिकला असून आमच्या सेवेचा इंडा या निवडणुकीत हरला असल्याचे देखील ते म्हणाले. इंडे जिकले, सेवा हरली....

कुठल्याही निवडणुकीत पारदर्शकता असली पाहिजे. माझ ईव्हीएम मध्ये पारदर्शकता नाही असा आरोप देखील त्यांनी केला. जगातील सर्व देश बॅलेट पेपरवर निवडणुका घेत असतील तर भाजप बॅलेट पेपरवर निवडणूक घेऊ असे का म्हणत नाही? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला.राज्यामध्ये महायुतीला बहुमत मिळाले असले तरी देखील महायुतीचा मुख्यमंत्री कोण? याबाबत अद्याप नाव समोर आलले नाही. विद्यमान काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाची चर्चा सुरू असताना भारतीय जनता पक्षाच्या वतीने देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, असर दावा केला जात आहे. त्यामुळे याबाबत राज्यात राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. यातच आता बच्चू कडू यांनी देखील एकनाथ शिंदे यांच्या नावाला पसंती दिली आहे.

तीन पक्षांचे सरकार स्थापन करताना वेळ लागतोच:थोडी वाट पाहा

नागपूर (वृत्तसंस्था)

तीन पक्षांचे सरकार स्थापन करताना थोडा वेळ लागतोच. मंत्रीपद कसे वाटायचे, कोणाला कोणते खाते द्यायचे, पालकमंत्री कुठे कोण असेल हे सर्व सूत्र तयार करून सरकार तयार होते. नुसतेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे नाव निश्चित करणे एवढेच नसते. त्यामुळे काही काळ जाईल आणि लवकरच सरकार स्थापन होईल अशी माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे माध्यमांशी बोलताना दिली. शपथ नोव्हेंबरमध्ये होईल की डिसेंबरमध्ये होईल, हे काही पंगतीत नाही असे ते म्हणाले.भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येकाला देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, असर दावा केला जात आहे. त्यामुळे याबाबत राज्यात राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. यातच आता बच्चू कडू यांनी देखील एकनाथ शिंदे यांच्या नावाला पसंती दिली आहे.

नाही. त्यांचा निर्णय अंतिम असतो. पक्षाचे नेते योग्य निर्णय करतात. लवकरच महायुतीचा मुख्यमंत्री शपथ घेईल. उद्धव ठाकरेंनी भाजपासोबत बेईमानी केली, तेव्हा त्यांना सरकार बनवण्यासाठी दीड महिना लागला होता, असाही टोला बावनकुळे यांनी लगावला.महायुती सरकार उत्तम काम करू शकते हा विश्वास असल्यानेच महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेने मते दिली आहेत. महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर अविश्वास दाखवून मतदारांचा अपमान केला जात आहे, अशी टीकाही बावनकुळे यांनी केली. लोकसभेच्या पराभवाचे आम्ही आत्मचिंतन केले, त्यानुन शिकलो व पुढे गेलो आणि जिंकलो. जनतेने डबल इंजिन सरकारला मते दिली आहेत.जनतेने महिआघा करेक्ट कार्यक्रम केला आहे.नोटेवरचा पोटनिवडणुकीत कॉंग्रेसचा उमेदवार विजयी झाला, त्या ठिकाणी ईव्हीएम चांगली होती का? असा प्रश्नही बावनकुळे यांनी केला.

लायन्सद्वारे सेवाकार्य चळवळ वाढवा मान्यवरांनी व्यक्त केले आपली मते

लायन्स इंटरनॅशनल प्रांत ३२३४ एच २ ची 'लक्ष्य' गेट कॉन्क्लेव्ह उत्साहात

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

लायन्स म्हणजे सेवाकार्य आणि नेतृत्वासाठी उत्कृष्ट चळवळ आहे. या माध्यमातून प्रत्येक क्लब आणि सदस्याने लायन्स चे कार्य वाढवून त्यात भर घालावी, असे मत लायन्स तर्फे आयोजित 'लक्ष्य' या परिषदेत उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केली. लायन्स इंटरनॅशनल प्रांत ३२३४ एच २ तर्फे एमआरटी महाविद्यालयातील आनंद हॉल येथे आयोजित लक्ष्य ही गेट कॉन्क्लुव्ह उत्साहात पार पडली. या परिषदेचे मुख्य अतिथी म्हणून प्रांतपाल गिरीश सिसोदिया आणि मल्टिपल चेअरपर्सन सुनील देसरडा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी द्वितीय प्रांतपाल राहुल ओसेकर, माजी प्रांतपाल जगदीश पुरोहित, राजेश राऊत आणि गेट कोऑर्डिनेटर प्रदीप गगे यांनी उपस्थित लायन्स पदाधिकारी आणि सदस्यांना मेंबरशिप, सेवा आणि लीडरशिप या संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी जी एल टी कॉर्डिनेटर जितेंद्र महाजन, संयोजक गजानन झालवार, रीजन सेक्रेटरी विपुल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या परिषदेचे आयोजन रिजन एकदंत संजीव गुप्ता, रिजन गौता संजय सारडा आणि रीजनस विजय अभिजीत जैन यांनी केले होते. यावेळी झोन चेअरपर्सन मृणालिनी पाटील, राजेश लुनिया, राजेंद्र बजाज, दीपक पुराणिक, दिपाली घुगे, रोनक भुषिवन, प्रसाद पाटणी, योगेश धोत्रे, सुमित सोनी, घनश्याम करणानी, जयदीप घुगे आणि विशाल झंवर यांनी परिषदेचे समन्वय केले. या परिषदेचे सूत्रसंचालन अश्विनी जयस्वाल हिने केले.

स्वतः ला वकील म्हणविणाऱ्या एकाने तहसील कार्यालयात घातला गोंधळ

उपजिल्हाधिकारी आणि नायब तहसीलदार यांच्याशी उद्धट वर्तन करीत त्यांना धमकावले तर अनेक कर्मचाऱ्यांशी देखील गैरवर्तन

केज । गौतम बचुटे

मला विभागीय आयुक्त यर घायतात. तहसीलदार गिड्डे यांना सेवेतून निलंबित करा. तुम्ही निवडणुकीत खूप मोठा घोटाळा केलाय. मी तुम्हाला काम करू देणार नाही. तुम्ही एककारांना ताकाळ बोलत कशे चाचे चिठिठ्ठी रेकॉर्डिंग सुरू करा. असे जोरजोराने ओरडून म्हणून तहसील कार्यालयातील उपविभागीय अधिकारी यांच्या दालनात आरडाओरड करून गोंधळ घालून उपजिल्हाधिकारी, नायब तहसीलदार यांच्याशी उद्धट वर्तन करून सरकारी कामात अडथळा निर्माण केला. यामुळे तहसीलच्या कर्मचाऱ्यांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

या बाबतची माहिती अशी की, दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११:०० वा. च्या सुमारास उपजिल्हाधिकारी दीपक वजाडे हे केज येथील तहसील कार्यालयातील त्यांच्या दालनात बसून विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचे काम करीत होते. त्यावेळी अचानक शार्दुल देशपांडे नावाचा व्यक्ती आस्थाना विभागात आला. त्याने शुभम राऊत तुमचा कार्यालयाचा दलाल आहे का? तो ओळखपत्र घालत नाही. तुम्ही सर्व ओळखपत्र न घालनारे अधिकारी व कर्मचारी हे दलाल आहेत. असे बोलून कार्यालयात गोंधळ घालता. तेथे असलेल्या नायब तहसीलदार श्रीमती आशा वाघ या तेथे हजर होत्या.

त्या नंतर त्याने उपविभागीय अधिकारी दीपक वजाडे, केज नगर पंचायतचे प्रभारी मुख्याधिकारी सचिन देशपांडे, महसूलविभागाचे नायब तहसिलदार भंडारे हे विधानसभा सार्वत्रीक निवडणुक २०२४ चे इंडेक्स कार्ड परिशिष्ट-४ चे कामकाज करत असलेल्या ठिकाणी त्यांचे ऑफीस कार्यालयामध्ये शार्दुल देशपांडे अचानक घुसला. त्याने काही न विचारता समोर येवून खुर्चीवर बसला आणि म्हणाला तुम्ही दिपक वजाडेच ना? असे म्हणाला. त्यावर उपविभागीय अधिकारी त्याला म्हणाले की, हो, बोला. आपले काय काम आहे? असे विचारले. त्यावर तो म्हणाला, की तो ड. शार्दुल देशपांडे असून तहसील

कार्यालयातील सहाय्यक शुभम राऊत हा कर्मचारी आहे का ? तो ओळखपत्र घालत नाही. तुम्हाला तर माहित आहे की, शासन निर्णया प्रमाणे सर्व कर्मचारी यांनी ओळखपत्र घालणे बंधनकारक आहे. उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून असे म्हणाला की, तुम्ही आहेत तर तुम्हाला सांगतो; या कार्यालयात ओळखपत्र न घाणारे शासकीय कर्मचारी नसून ते सर्वजण दलाल आहेत. त्यांना कोणालाही तो काम कन देणार नाही. त्यांना ताकाळ बाहेर काढा. तसेच निवडणुक संपल्यावर जो गोंधळ घातला. त्याचे सर्व व्हिडीओ त्याच्याकडे आहेत.

तसेच तक्रालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे मॅडम, मंजुशा मिसकर यांना सुध्दा तक्रारी केल्या आहेत. विभागीय आयुक्त गावडे हे सुध्दा ओळखपत्र घालीत नाहीत. त्यामुळे त्यांच्या नावाचा एकेरी उल्लेख करून तो म्हणाला की, हे सुध्दा लोकसेवक आहेत. मालक नाही. असे म्हणून तुम्ही व्यवस्थीत काम करा. नाही तर तुम्हालाही या कार्यालयात बसून अजिबात काम करता येणार नाही आणि तुम्हाला काम कन देणार नाही. असे म्हणून शार्दुल देशपांडे यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या टेबलवर असलेली सरकारी कामकाजाची फाईल उचलली व मोठमोठ्याने आरडा ओरडा सुरु केली. त्या नंतर पोलिसांना माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील आणि शहादेव मेहेत्रे यांनी हजर होवून शार्दुल यास ताब्यात घेतले. या प्रकरणी शुभम राऊत यांच्या तक्रारी वरून शार्दुल देशपांडे यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात अदृश्यपराध स्वरूपाचा गु.र.नं.१९६२/२०२४ भा. न्या. सं. १२१ व १२४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

विजेचे कोटेशन असलेल्या शेतकऱ्यास मोटार चालवू नको म्हणून विरोध करीत केली मारहाण

मारहाणीत शेतकऱ्याचा हात फ्रॅक्चर;नऊ जणांच्या विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल

केज । गौतम बचुटे

शेतातील पपाचे रितसर कोटेशन भरलेले असतानाही डीपी वरून वीज कनेक्शन घेवून कृषी पंप चालवण्यास विरोध करून एका शेतकऱ्याला नऊ जणांनी मारहाण केल्याची घटना केज तालुक्यात घडली आहे. या प्रकरणी नऊ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतची माहिती अशी की, दि. २६ नोव्हेंबर रोजी केज तालुक्यातील साळेगाव पासून जवळ असलेल्या लोखंडे वस्तीवर राहणारे बालासाहेब रामचंद्र जाधव यांना त्यांचे शेता शेजारी असलेले वचिष्ठ बळीराम जाधव, विनोद वचिष्ठ जाधव, महादेव सखाराम जाधव, अभिजीत महादेव जाधव, मकुंद दत्तराम जाधव, अजय मुकुंद जाधव, गंगल महादु जाधव, रंदावणी वचीष्ठ जाधव आणि अशोक गोरखनाथ जाधव यांनी संगनमत करून गैरकायद्याची मंडळी जमा करून घरा समोर आले. त्यांनी आवाज देवून बालासाहेब जाधव यास घराचे बाहेर अंगणात बोलावून घेतले आणि वचिष्ठ बळीराम जाधव हा म्हणाला की, तु डीपी वरून मोटार का चालविते ? असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावर बालासाहेब त्यांना म्हणाले की, माझे कोटेशन आहे. मी मोटार चालविणार. असे म्हणताच विनोद जाधव त्यांना म्हणाला की, तु लवई माजलास. तुला मी बघुन घेतो. असे म्हणून वचीष्ठ जाधव याने तेथेच असलेले लोखंडी रॉड घेवून बालासाहेब यांच्या डाव्या हातावर मारून जखमी केले. बालासाहेब यांची पत्नी सविता व मुलगा वैभव हे त्यांना आम्हाला



मारु नका असे म्हणत होते; परंतु त्यांनी काहीएक न ऐकता विनोद जाधव व मुकुंद जाधव यांनी त्यांचे हातातील लाकडी काठीने व अभिजीत जाधव याने त्याचे हातातील वायरने पत्नी सविता, मुलगा वैभव, यांना मारहाण करून जखमी केले. या भांडणात बालासाहेब जाधव यांचा डावा हात फ्रॅक्चर झाला आहे.

बालासाहेब जाधव यांच्या तक्रारी वरून दि. २८ नोव्हेंबर रोजी वचिष्ठ जाधव, विनोद जाधव, महादेव जाधव, अभिजीत जाधव, मकुंद जाधव, अजय जाधव, मंगल जाधव, रंदावणी जाधव, अशोक जाधव सर्व राहणार लोखंडे वस्ती यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु. र. नं. ६२८/२०२४ भा. न्या. सं. ११५ (२), ११८(१)१८९(२), १९०,१९१ (२),३५१(२),३५१(३),३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल बाबासाहेब बांगर हे तपास करीत आहेत.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा वाळू माफीयांना पुन्हा एकदा दणका

बीड । प्रतिनिधी

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी नुकतीच वाळू माफीयांविरोधात कारवाई करत दोन हायवा जमा केल्या . यामुळे महसूल अधिकारी व कर्मचारी हे सतर्क झाल्याचे दिसून येत आहे . त्याचाच भाग म्हणून बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , त्याचे अधिनस्त नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर हे दिवस रात्र गस्त घालत असून वाळू चोरीवर निर्बंध आणण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे .

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी दि. २८ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह पथक प्रमुख नायब तहसीलदार प्रशांत जाधवर व पथकाने पाली येथून केजकडे जात असताना नेक्नूर रोडवर मांजरसुम्भाजवळ अंदाजे ५ प्रास अवैध वाळू वाहतूक करणारा एम पी ८७ चक्र३-१७०४२९ पकडून पोलीस स्टेशन तेलगाव यांचे ताब्यात दिला . सदर वाहनाच वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही करण्यात येईल असे तहसीलदार यांनी सांगितले . या वाहनाचे मालक प्रशांत नवले , राहणार पाली , तालुका जिल्हा बीड हे असून , ड्रायव्हर उमेश मेमाने हा आहे .या कार्यवाहीमध्ये मंडळ अधिकारी अशोक डसपे , मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे , पोलीस उपनिरीक्षक पवनसिंग उंचाळे , तलाठी विकास ससाणे , तलाठी संजय नेवडे , तलाठी अनिल गायकवाड , तलाठी कृष्णा रत्नपारखी , तलाठी अक्षय शिंदे , महसूल सहायक अमोल डोंगरे यांचाही सहभाग होता . जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी अशाच प्रकारच्या कारवाना जिल्हाभर सुरू ठेवण्याबाबत सर्व संबंधित विभागांस सूचित केलेले आहे . कोणीही अनधिकृत रित्या गौण खनिजची वाहतूक करू नये तसेच नागरिकांनी सुद्धा अशा प्रकारची गौण खनिजाची अवैध वाहतूक होत असल्यास त्याबाबत संबंधित महसूल अधिकारी पोलीस अधिकारी यांना तात्काळ कळवावे असे बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे .बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांची हयगय केली जाणार नाही, असा इशारा दिलेला आहे . अवैधरित्या गौण खनिजची म्हणजेच वाळू , मुरूम यांची वाहतूक करणारी वाहने दिसल्यास अथवा सारे आढळून आल्यास त्याची माहिती संबंधित मंडळ अधिकारी , तलाठी , पोलीस अधिकारी , पोलीस पाटील यांना तात्काळ द्यावी आणि नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे असे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केलेले आहे .

वडवणी येथे मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन

मयुरेश्वर हॉस्पिटलमध्ये होणार तपासणी

वडवणी । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मराठी पत्रकार परिषद स्थापना दिनानिमित्त वडवणी मध्ये पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या आदेशाने आणि मराठी पत्रकार परिषद सलग डिस्टिल्ट मीडिया परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अजय आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणी आणि डॉ.विजयकुमार निपटे यांच्या मयुरेश्वर रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने येत्या ३ डिसेंबर २०२४ रोजी वडवणी येथील पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत बीड पळी हायवे रोडवर असलेल्या मयुरेश्वर हॉस्पिटल येथे ठेवण्यात आले असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणी यांच्या वतीने देण्यात आली आहे.

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रभरात ३ डिसेंबरला दरवर्षी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येते. या शिबीरात पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबीयांची आरोग्य तपासणी केली जाते. या वर्षी वडवणी येथील डॉ विजयकुमार निपटे यांच्या मयुरेश्वर हॉस्पिटल मध्ये १० ते २ या वेळेत होणार आहे. या शिबीरामध्ये रक्तदाब, मधुमेह, इसीजी, रक्त गट आदींची तपासणी होणार आहे. तरी सर्व पत्रकारांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणी आणि डॉक्टर विजयकुमार निपटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

'बालविवाह मुक्त भारत' अभियानाचा जिल्ह्यात शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

बालविवाह मुक्त भारत अभियानाच्या समर्थनार्थ युवा ग्राम विकास मंडळ यांच्यातर्फे बीड मध्ये जनजागृती मोर्चा; हजारोंच्या संख्येने नागरिक सहभागी झाले जिल्हाभरात हे अभियान राबवण्यात येणार असुन पंचशील दिवसात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे .

जिल्हात प्रशासनाच्या मदतीने २४० बालविवाह रोखणाऱ्या युवा ग्राम विकास मंडळ ने म्हटले की, या अभियानामुळे बालविवाह निर्मूलनाच्या लढाईला नवी दिशा मिळेल. रंलीत बालविवाह पीडित मुली, सरकारी अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यांनी बालविवाहविरुद्ध शपथ घेतली. विवाह प्रक्रियेतील पंडित, मौलवी, हलवाई, बँडवाले, तसेच इतर सर्व संबंधित हितसंबंधीत समाजातील विविध घटकांनी अभियानाला पाठिंबा दिला.युवा ग्राम विकास मंडळ हे बालहक्क संरक्षणाशी कार्य करणाऱ्या २५० हून अधिक स्वयंसेवी संस्थांच्या 'जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रेन' या राष्ट्रीय संघटनेचे सदस्य आहे.'बालविवाह



मुक्त भारत' अभियानाचा जिल्हात शुभारंभ करण्यात आला जिल्हाभरात विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत .भारत सरकारच्या 'बालविवाह मुक्त भारत' या मोहिमेच्या समर्थनार्थ युवा ग्राम विकास मंडळ यांनी बीड येथे बालविवाह विरोधी विविध ठिकाणी जनजागृती व शपथविधी कार्यक्रम आयोजित केले . या कार्यक्रमांमध्ये समाजातील सर्व स्तरांतील नागरिक सहभागी झाले. मशाल मिरवणूक आणि कैडल मार्चसह आयोजित कार्यक्रमांमध्ये बालविवाह पीडित मुली, महिला, मुलं आणि पुरुष यांनी बालविवाहविरोधात शपथ घेतली.

सर्व विवाह संबंधित व्यक्ती – पंडित, मौलवी, हलवाई, इकोटेर, बँडवाले, लग्न पत्रिका छापणारे – यांनी शपथ घेतली की, ते बालविवाहामध्ये सहभागी होणार नाहीत आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कळवतील.युवा ग्राम विकास मंडळ २५० हून अधिक स्वयंसेवी संस्थांच्या 'जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रेन' या राष्ट्रीय संघटनेचे सदस्य आहे. या संघटनेने जिल्हात प्रशासनाच्या मदतीने २०२३-२४ मध्येच १७० बालविवाह रोखले आहेत. केंद्रीय महिला व बालविकास मंत्री प्रव्रज्पणी देवी यांच्या नेतृत्वाखालील अभियानाच्या समर्थनार्थ युवा ग्राम विकास मंडळाचे संचालक एच पी देशमुख म्हणाले, हा उपक्रम भारतातील मुलींना शिक्षित, सशक्त आणि आत्मनिर्भर करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. बालविवाह निर्मूलन ही विकसित भारताच्या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी अनिवार्य आहे. 'जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रेन'चे संस्थापक भुवन ऋषु यांचे विचार भुवन ऋषु म्हणाले, ही चळवळ देशातील बालविवाहाच्या उच्चदरासाठी एक प्रभावी पाऊल ठरत आहे. अनेक स्वयंसेवी संस्था आणि व्यक्तींनी एकत्रित काम केल्यामुळे देशभरात ही चळवळ यशस्वी होत आहे. या उपक्रमाने देशाच्या हजारो मुलींसाठी नवी आशा निर्माण केली आहे. कार्यक्रमात सहभागी झालेल्या एका बालविवाह पीडितेने समाधान व्यक्त करत म्हटले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'बालविवाह मुक्त भारत' आह्वान २७ नोव्हेंबर रोजी दिल्लीत केंद्रीय महिला व बालविकास मंत्री प्रव्रज्पणी देवी यांच्या नेतृत्वाखाली या अभियानाची सुरुवात झाली. यावेळी पंचायत आणि शाळांना बालविवाहाविरोधात शपथ दिली गेली. लक्करच २५ कोटी लोकांना या मोहिमेत सहभागी करण्याचे उद्दिष्ट आहे. युवा ग्राम विकास मंडळ ५० गावात बाल विवाह मुक्त गावं करण्याचे काम सद्या करत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dalnik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kalj tq.kalj dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077